राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 18 (1) अन्वये प्राप्त तक्रार क्रमांक 172/2016

---

1. श्री. किशोर ऊर्फ हिशोद पत्रुजी तुरे, : **तक्रारकर्ता**
   रा. सरस्वती विद्यालयामागे, भिवापूर वार्ड,
   बाबुपेठ, जि. चंद्रपूर.

विरुध्द

2. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, : **उत्तरवादी**
   जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.

3. प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, : **उत्तरवादी**
   जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर

4. आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपूर जि. चंद्रपूर.

(आदेश पारीत दिनांक 30.12.2016)

अपीलकर्ता, श्री. किशोर ऊर्फ हिशोद पत्रुजी तुरे यांनी राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 18 (1) नुसार दिनांक 12.04.2016 अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. त्यावर आयोगाने तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक 13.12.2016 रोजी नोटीस काढून दिनांक 30.12.2016 रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोष्टाने कळविण्यात आले.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. मोरेश्वर वनकर उपस्थित आहेत.

2. तक्रारकर्ता यांनी आयोगाने अपील क्रमांक 2598/2015 मध्ये दिनांक 20.11.2015 रोजी पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे "माहिती देण्यात आलेली नाही" असे कारण नमूद करुन तक्रार दाखल केलेली आहे. आयोगाने अपील क्रमांक 2598/2015 मध्ये दिनांक 20.11.2015 रोजी पारीत केलेले आदेश खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

"अपिलार्थी यांचे सदरचे द्वितीय अपील मंजुर करण्यात येत असून अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात मा. आयुक्त, चंद्रपूर यांच्या कार्यालयात 03 मुद्यांवर माहिती मागितलेली असून दिनांक 13.04.2015 रोजी केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत अणि मा. उपसंचालक, नगरपरिषद, चंद्रपूर यांनी त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांना दिलेल्या पत्रावर प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत आणि केलेल्या कार्यवाहीची झेरॉक्स प्रतीची माहिती मागितलेली आहे. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. करिता आयोग कलम 19 (8)(क) अन्वये विद्यमान मा. आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपूर यांना असे निर्देश देते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील तक्रारीवर त्यांनी 15 दिवसाच्या आंत निष्पक्षपणे चौकशी करुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी व त्याचा अहवाल आयोगास सादर करावा."

3. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर आज दिनांक 30.12.2016 रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष सांगितले की, मा. आयोगाने अपील क्रमांक 2598/2015 मध्ये दिनांक 20.11.2015 रोजी आदेश पारीत करुन वर्तमान आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपूर यांनी अपिलार्थी यांच्या तक्रारीवर 15 दिवसाच्या आंत निष्पक्षपणे चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश केलेले असतांनासुध्दा आजपर्यंत चौकशी अहवालाची प्रत देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमक्ष सांगितले की, मा. आयोगाने अपील क्रमांक 2598/2015 मध्ये दिनांक 20.11.2015 रोजी आदेशीत केल्याप्रमाणे मा. आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपूर यांनी दिनांक 08.07.2016 रोजी प्रत्यक्ष चौकशी करुन चौकशी अहवालाची प्रत तक्रारकर्ता यांना दिनांक 11.08.2016 रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध कागदपत्रे तसेच झालेला युक्तीवाद लक्षात घेता, आयोगाने अपील क्रमांक 2598/2015 मध्ये दिनांक 20.11.2015 रोजी आदेशीत केल्याप्रमाणे आयुक्त, महानगरपालिका, चंद्रपूर यांनी चौकशी करुन, चौकशी अहवालाची प्रत दिनांक 11.08.2016 रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदर तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहे.

आदेश

सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

ठिकाण :- नागपूर
दिनांक :- 30.12.2016

जावक क्रमांक 2460 ----------दिनांक 18 APR 2017 ----------

172/2016, 3/3

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर फक्त
सत्यमेव जयते
नागपूर

उपसचिवांच्या स्वाक्षरीनिशी निर्गमीत
उपसचिव,
राज्य माहिती आयोग,
नागपूर खंडपीठ

निर्गमित केले
~~02 APR 2017~~
18 APR 2017

तक्रार आदेश पारीत दिनांक 30.12.2016 सचिन/कांबळे